# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ३०/०९/२०२३

दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| ०१ | बडनेरा अप नं. ७०८/२०२३ कलम ३२४, ५०४ भादवी | बारीपुरा जुनी वस्ती बडनेरा | घटना ता वेळ - दि. २९/९/२३ चे १६.३० वा दाखल ता वेळ - दि. २९/९/२३ चे २१.०१ वा | विनोद माणीकराव सातपुते वय ४९ वर्ष धंदा मजुरी रा बारीपुरा जुनी वस्ती बडनेरा | उमेश माणीकराव सातपुते वय ४२ वर्ष रा बारीपुरा जुनी वस्ती बडनेरा | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आऱोपी हे एकाच घरात वेगवेगळे राहत असुन भाऊ भाऊ आहे आरोपी याला दारु पिण्याचे व्यसन असुन नेहमी दारु पिवुन वादविवाद करतो यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्याचें खोलीत झोपले असता आरोपी दारु पिवुन आला व फि च्या खोलीच्या दरवाज्याला लाथा मारुन जोरजोराने ओरडु लागला म्हणुन फि हे खोलीच्या बाहेर आले व विचारले ओरडत का आहे तेव्ही आऱोपी याने फिर्यादीस दारु पिण्याकरिता पैसे मागीतले फि ने पैसे देण्यास नकार दिला असता आरोपी ने शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहान केली व आऱोपीने आरोपीचे खोलीतुन लाकडी काठी आनुन फिर्यादी चे डोक्यावर वर मारुन जख्मी केले फि चे डोक्यातुन रक्त निघत असल्याचे पाहुन आरोपी तेथुन पळुन गेला. फि यांनी पोलीस स्टेशनला येवुन कारवाई करिता रिपोर्ट दिला . अशा फिर्या दिचे जबानी रिपोर्ट वरुन व मेडीकल सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल. |
| २ | पो.स्टे नागपुरीगेट अमरावती अप क्र ४९४/२३ कलम ३२४,३४ भादवी | मुफ्ती जिया मदरसा जवळ जामिया नगर अमरावती | दि.२९/०९/२०२३ चे १५/३० वा दाखल ता.वेळ- दि. २९/०९/२०२३ चे १८/४७ वा | अहेमद खाँ अमजत खाँ वय ३८ वर्ष रा. ह्यात नगर मुफ्ती जिया मदरसा जवळ लालखडी अमरावती | सोहेब राजा फर्निचर वाले यांचा मुलगा २) सोहेब चे काका दोन्ही रा. ह्यात नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिऱ्यादी व आरोपी हे एकामेकांच्या शेजारी राहत असुन यातील फिर्यादी हे त्याचे घराचे किरकोळ काम करत असतांना यातील दोन्ही नमुद आरोपी यांनी तुमच्या काम करण्यामुळे माझे घराचे भित्तीच्या विटा पडत आहे. असे म्हटले असता फिर्यादी यांनी असे कधी होते का असे म्हणुन त्याचे घराचे काम थांबविले व घरातुन बाहेर फिरायला गेले असता नमुद घटणा ता. वेळी ठिकाणी यातील आरोपी यांनी संगणमत करुन फिर्यादीस मारहान केली व आरोपी क्र. १ याने कत्याने फिर्यादीचे पायावर मारुन जखमी केले व लोक फिर्यादीचे मदतीस येत असल्याचे पाहुन पळुन गेले. अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट् वरुन व मेडीकल सर्टीवरुन सदरचा गुन्हा दाखल. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | पो.स्टे नागपुरीगेट अमरावती अप क्र ४९५/२३ कलम ३२४, भादवी ४, २५ आर्म अँक्ट | गामाभाई यांचे पानठेल्या समोर पाटीपुरा अमरावती | दि.२९/०९/२०२३ चे १७/३० वा ते १८/०० वा दा. ता.वेळ दि.२९/०९/२०२३ चे २१/३० वा | अरफात खान आमीर खान वय १५ वर्ष रा. पाटीपुरा अमरावती | मुज्जमिल (मुज्जु) शेख जब्बार वय १९ वर्ष रा. पाटीपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे परिचयाचे असुन यातील आरोपी याने शुल्लक कारना वरुन तलवारीने फिर्यादीचे डाव्या हातावर व पायावर मारुन जखमी केले व फिर्यादीचे मित्र मदतीस येत असल्याचे पाहुन आरोपी पळुन गेला. अश्या फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट व मेडीकल सर्टी. वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

- **घर फोडी :-**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो.स्टे सिटी कोतवाली अप क्र ४३४/२३ कलम ४५४, ४५७, ३८० भादवि | खत्री कॉम्पलेक्स अमरावती | गु.ता.वेळ दि.२९/९/२३ चे सकाळी ११.३० वा दा.ता.वेळ दि.२९/९/२३ चे १९.०९ वा | नविनचंद्र चंप्पालालजी खत्री वय ६१ वर्ष कँम्प रोड अमरावती | अनोळखी ईसम | हकीकत अशाप्रकारे आहे की फिर्यादी नामे नविनचंद्र चंप्पालालजी खत्री वय ६१ वर्ष व्यवसाय घरकाम रा बी.एस,एन एल ऑफीस जवळ कँम्प रोड अमरावती समक्ष पो.स्टे ला येवुन जबानी रिपोट देतो की मी वर नमुद ठिकाणी कुटुबीसोबत राहतो व आमचे खत्री कॉम्पलेक्स मध्ये वडीलोपार्जीत खत्री कुलर्स व ईलेक्ट्रॉनिकचे दुकान असुन माझा मुलगा नामे धिरेन नविन खत्री हा सदरचे दुकान पाहतो दि.२६/९/२३ रोजी रात्री अंदाजे ०९.०० वा दरम्यान माझ्या मुलाने दुकान बंद केले व त्यांची प्रकृती ठिक नसल्याने तो घरीच हजर होता तेव्हा आज दि.२९/९/२३ रोजी दुपारी ०२.०० वा दरम्याव राझीक गणरेजवाला याचां फोन आला की तुमच्या दुकानामध्ये चोरी झाली वरुन मुलगा घरी नसल्यामुळे मी दुकानात जावुन पाहीले असता दुकानासमोरुन काच फोडुन आतील ग्रील तोडुन कोणीतरी अत्रात ईसमाने आत प्रवेश करुण दुकानामध्ये ठेवलेल्या कुलरच्या कँल्प लोखंडाच्या किमंत अंदाजे २५०० रु व कँश काउन्टर अस्थाव्यस्थ केले होते असे मला दिसले. माझे दुकानात २६/९/२३ ते २९/९/२३ चे रात्री दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने आत प्रवेश करुन कुलरच्या लोखंडी कँल्प चोरुन नेले वरुन मी पो.स्टे ला तक्रार देण्यास आले हाच माझा जवानी रिपोट आहे वरुण सदरचा गुन्हा दाखल |

➢ ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | पो.स्टे. नांदगांवपेठ अंप न ३९०/२०२३ कलन २९४,५०९ भादवि | अमरावती | घ.ता.वेळ दि २९-९- २३ चे १९-०० वा दा.ता.वेळ दि २९-९-२३ चे २२/३० वा. | एक महिला | विजय राऊत वय २९ वर्ष , रा. जुनी वस्ती रहाटगाव ता जि अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फि ही एका कारखान्यात ११-०० वा कामाला गेली व काम संपवुन ०७-०० वा अँटो ने घरी परत येत होती. रहाटगाव चौक येथुन घरी जात असताना यातील आरोपी तेथे आला व शिविगाळ करायला लागला व आरोपी ने तिला म्हटले की तुझ्या नव-याने माझ्या कडुन १५०००/- रु घेतले त्याचे व्याज दिले नाही व अश्लिल शिव्या दिल्या. मी त्याला मारायला गेले असता त्याने माझा हात अडवला व तो त्याची टु व्हिलर घेवुन निघुन गेला व गाडीची नंबर माहीती नाही मी घाबरेले होते माझे पती माझी रोडवर वाट पाहत होते मी त्याना सर्व सांगितले. अशा फि च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पो स्टे गाडगे नगर अप क्र ११९४/२३ कलम २९४,३४ भा द वि | अमरावती | घ ता वे- २९.०९.२०२३ चे १७.०० वा दरम्यान दा ता वे- २९.०९.२०२३ चे २१.०३ वा | एक महिला | १. परिक्षित लंगडे २. शशांक उडाखे रा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिंयादी यांना पोलिस बॉईज संघटनेचे शुभम बाबाराव भटकर यांनी माहिती दिली की त्याचे मोबाईलचे सोशल मिडीयावर तो रिल पाहत असतांना ऑफिसियल परिक्षित (इंग्रजीत) या इंस्टाग्राम अकाऊंट वर पोलिसांसंबंधीत अश्लिल शब्द वापरुन रिल बनविली आहे व ती पोस्ट केली. सदर रिल मध्ये परिक्षीत हा दुचाकी मोपेडवर येतो त्याचा मित्र समोरुन त्याला सांगतो की.हेल्मेट वेल्मेट घालत जा,समोर पोलिसवाले आहे ना, त्यावर परिक्षित याने अश्लिल शब्दाचा वापर केला. असा व्हिडियो पोस्ट करुन पोलिसांची प्रतिमा मलिन व्हावी व समाजामध्ये पोलिसाप्रती आदर कमी व्हावा असा अश्लिल भाषेचा वापर केला. अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |
| ४ | पो स्टे राजापेठ अप क्रं ८७२/२०२३ कलम १४२ मपोका | दसरा मैदान पावर हाऊस जवळ, अमरावती | २९/०९/२०२३ चे १६/०० वा. दा. ता. वेळ २९/०९/२०२३ चे २०.४१ वा | पो स्टे राजापेठ, अमरावती शहर | करण दिपकसिंग ठाकुर, वय २४ वर्ष, रा वसंतराव नाईकनगर, अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना तारीख वेळी व ठिकाणी पो स्टे हददीत पेट्रोलिंग डयुटी करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहितीवरुन तडीपारी आरोपी करण दिपकसिंग ठाकुर वय २४ वर्ष रा वसंतराव नाईक नगर अमरावती हा कोणाचीही परमिशन न घेता दसरा मैदान पावर हाऊस जवळ येथे मिळुन आला वरुन त्याला अमरावती शहरात येण्याचे कारण विचारले असता उडवाउडवीचे व असमाधानकारक उत्तर दिल्याने तसेच सदर आरोपी हा मा पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ अमरावती शहर यांचे आदेश क्र पोउपआ परि-२/तडीपार/७९०/२०२३ दि १७.०९.२०२३ अन्वये ०६ महिन्याकरीता अमरावती जिल्हयातुन तडीपार करण्यात आलेला असतांना देखी नमुद आरोपी हा अमरावती शहरात मिळुन आल्याने त्याचे विरुध्द कलम १४२ मपोका अन्वये गुन्हा नोंद करुन तपासात घेतला. असे फि. चे जबाणी रीपोर्ट वरून गून्हा दाखल . |

➢ अकस्मात मृत्यु :-

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ८ |
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा ६३/२०२३ कलम १७४ जाफौ | गोविंदा रेसीडेन्सी कलोती नगर अमरावती | एक मृतक महिला | राजेश नरसिंग बोडे वय ५१ वर्ष धंदा- शिक्षक रा गोविंदा रेसीडेन्सी कलोती नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती पो स्टे ला येवुन जबानी रिपोर्ट देतो की वर दिलेल्या पत्यावर राहते आणि स्कुल ऑफ स्कॉलर निंभोरा खुर्द बडनेरा रोड अमरावती येथे शिक्षक म्हणुन नोकरी करतो आज रोजी दि २९.०९.२०२३ रोजी अंदाजे सकाळी ९.३० वा मी घरी हजर होतो माझी पत्नी धंदा घरकाम आणि मुलगा वय १२ वर्ष असे घरी होतो सकाळी ०९.०० वा माझी पत्नी ही आंघोळ करण्याकरीता बाथरुममध्ये गेली बराच वेळ झाला बाहेर आली नाही म्हणुन मी आवाज दिला तर माझी पत्नी ही बाथरुमध्ये चित्त अवस्थत पडलेली दिसली शेजारी राहणारे यांना बोलावुन त्याचे मदतीने गिताला उचलुन रेडियंट दवाखाना कल्याननगर येथे नेले तिला मार वगैरे नव्हता परंतु ती बोलत नव्हती हालचाल करीत नव्हती रेड्यंट येथुन इर्विन दवाखाना अमरावती येथे नेले इर्विन येथील डॉक्टरांनी मृत घोषीत केले तिचा मरणात मांझी काही संशय नाही माझी पत्नी गिता हिचा मृत्यु हार्ट फेल याने झाला आहे. फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन व डि ओ सा यांचे आदेशआने सदरचा मर्ग दाखल. |
| २ | नागपुरी गेट मर्ग क्र. १८/२०२३ कलम १७४ जाफौ. | राबीया मज्जीद बिलास कॉलणी डि ऐड कॉलेज अमरावती | मोहम्मद अकिल मोहम्मद जुल्फकार वय २० वर्ष रा. बिहारी गड सहारनपुर उत्तर प्रदेश | मोहम्मद अबुबकर मोहम्मद सुलेमान वय २५ वर्ष रा. सहारनपुर उत्तर प्रदेश | हकीकत अशा प्रकारे आहे. की फिर्यादी यांनी सांगीतले की मागील तीन महीन्यापासुन आम्ही १२ लोक जमात करीता अमरावतीला आलो होतो व मिळुन राहत होतो दि. २९/०९/२०२३ चे ०४/०० वा पासुन ०८/०० वा पर्यन्त आम्ही सर्व नमाज चहापाणी करुन आराम करीत होतो ०९/०० वा तालीम करीता उठलो असता आमच्यातील (मृतक) मोहम्मद अकिल मोहम्मद जुल्फकार वय २० वर्ष हा दिसुन न आल्याने त्याला शोधण्या करीता गेलो असता वर टेरीसवर असलेले किचन मध्ये जावुन पाहीले असता किचन च्या छतावर गळ्या मध्ये रस्सी घेवुन लटकलेला दिसला त्या बाबत पोलीस स्टेशनला माहीती दिली व त्याला खाली काढुन ईर्वीन दवाखाना येथे अँम्बुलन्स मध्ये उपचारा करीता पोलीसांनी नेले असता डॉ. सा. यांनी तपासुन मृत घोषीत केले अशा मरणाचा मेमो प्राप्ता झाल्याने सदरचा मर्ग दाखल |